# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 15/03/2021 (सोमवार)
(सकाळ)

---

### चोरी

पो. स्टे. भिवापुर :– अंतर्गत अर्धा किमी अंतरावर मौजा कृषी उत्पन्न बाजार समीती भिवापुर येथे दिनांक 12/03/2021 चे 14.00 वा. ते 14.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– शामराव बाबुराव कामडी, वय 35 वर्षे, रा. तास ता. भिवापुर, अडतीया कृषी उत्पन्न बाजार समीती भिवापुर हे कृषी उत्पन्न बाजार समीती भिवापुर येथे काही कामा निमीत्त आले असता त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समीती भिवापुर समोर गाडी उभी करून गाडीच्या डीक्की मध्ये नगदी 40,000/–रू. तसेच  बॅंक ऑफ इंडीयाचे पासबुक व श्रीकृष्ण बॅंकेच्या दोन चेक बुक तसेच बाजार समीतीचे कास्तकार बुक व बिल बुक ठेवुन डिक्कीला मुलुप लावुन कृषी उत्पन्न बाजार समीतीच्या ऑफीस मध्ये गेले. अर्ध्या तासाने फिर्यादी परत आले असता त्यांना गाडीच्या डीक्कीचा कुलुप तुटलेला दिसला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या गाडीचा कुलुप तोडुन वरील नगदी व दस्ताएवज चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. भिवापुर येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा चंद्रकांन्त रेवतकर 9823719197 हे करीत आहे.

### विनयभंग

पो.स्टे. उमरेड :– दि. 13/03/2021 चे 21:00 वा. चे दरम्यान आरोपी शुद्बोधन मुरारी रंगारी, वय 28 वर्ष, रा. उदासा ता. उमरेड जि. नागपूर हा वय 28 वर्षीय पीडित/फिर्यादी हिच्या घरी दारू पिवुन आला व म्हणाला की, ''मला तुझा मोबाईल नंबर दे, तु हॅंडसम आहे, तुला पैसे किती पाहीजे'' व अश्लिल बोलुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. यावरून फिर्यादीने ही घडलेली हकीकत तिचे पतिला सांगीतली तेव्हा फिर्यादीचे पतिने आरोपी ला हटकले व याबाबत विचारले असता आरोपीने फिर्यादीचे पतिला सुध्दा धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 354(अ) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि खोब्रागडे पो स्टे उमरेड मो नं  8308082094 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर